क्र.CIC/अ.क्र.६६०३/२०२६

श्री. भरत व्ही. गुरजार
7, श्रीजी भवन, गाझादर स्ट्रीट,
चीरा बाजार, मुंबई-400 002.

विरुद्ध

जनमाहिती अधिकारी तथा सहाय्यक अभियंता (बी विभाग)
सहाय्यक अभियंता (बी विभाग) यांचे कार्यालय,
महापालिका इमारत, १२१, रामचंद्र भट्टमार्ग,
बाबुला टैंक, क्रॉस लेन, मुंबई-४०० ००९.

प्रथम अपिलीय अधिकारी तथा कार्यकारी अभियंता तथा पदनिर्देशित अधिकारी (बी विभाग)
कार्यकारी अभियंता तथा पदनिर्देशित अधिकारी (बी विभाग) यांचे कार्यालय,
महापालिका इमारत, १२१, रामचंद्र भट्टमार्ग,
बाबुला टैंक, क्रॉस लेन, मुंबई-४०० ००९.

व्दितीय अपील अर्ज सुनावणी दिनांक : ०५.०८.२०२६

अपीलकर्ता : अनुपस्थित
विद्यमान जन माहिती अधिकारी : उपस्थित
प्रथम अपीलीय अधिकारी : अनुपस्थित

मूळ अर्जाचा दिनांक	जन माहिती अधिकाऱ्याच्या उत्तराचा दिनांक	प्रथम अपीलाचा दिनांक	प्रथम अपीलीय प्राधिकाऱ्याच्या निर्णयाचा/आदेशाचा दिनांक
०४.१०.२०२१	०१.११.२०२१	१०.११.२०२१	२८.०४.२०२२

अपिलार्थीनी दाखल केलेल्या दिनांक ०४/१०/२०२१ रोजीच्या जोडपत्रानुसार २२/२४, कांबेकर मार्ग, बी विभाग येथील अनधिकृत बांधकामाबाबत त्यांनी केलेल्या तक्रारीवर झालेला विलंब व दप्तर दिरंगाई कायद्याचे झालेले उल्लंघन याबाबत उपरोक्त विलंबास जबाबदार असणाऱ्या अधिकारी/कर्मचारी यांच्यावर केलेली कारवाई तसेच त्यांच्या तक्रार अर्जावर झालेली कारवाई याची माहिती मागितलेली आहे.

तत्कालीन जन माहिती अधिकाऱ्यांनी दिनांक ०१/११/२०२१ रोजी अपिलार्थीना विहित मुदतीत उत्तर दिले असून उपरोक्त माहिती ही कार्यालयातून प्राप्त करून घ्यावी असे सुचित केले. तथापि, या विरुद्ध अपिलार्थीनी नेमकी कार्यवाही काय केली याचा कुठलाही तपशील दिला नसल्याने अपील दाखल केले.

तत्कालीन अपिलिय अधिकारी तथा कार्यकारी अभियंता, इमारत व कारखाने, बी विभाग यांनी तक्रारीवर काय कार्यवाही केली हे **माहितीचा अधिकार अधिनियम २००५** कायदा अंतर्गत अपेक्षित नसून यात माहिती निर्मिती म्हणजेच (Information Creation) असून जन माहिती अधिकाऱ्यांनी **कलम २ (च)** प्रमाणे कार्यालयीन अभिलेखात उपलब्ध असलेली माहिती देणे अपेक्षित असून माहिती तयार करून देणे अथवा झालेली कार्यवाही अथवा कारवाई करणे अपेक्षित नसल्याचे नमूद केले आहे. तसेच जन माहिती अधिकाऱ्यांनी या आधीच उपलब्ध असलेल्या नस्तीचे निरीक्षण करण्याकरीता व ते सशुल्क प्रदान करण्याच्या हेतूने सकारात्मक प्रतिसाद दिला असल्याचे अपिलीय अधिकाऱ्यांनी त्यांच्या आदेशात नमूद केले असून त्याविरुद्ध दिनांक १८/०५/२०२२ रोजी प्रस्तुत द्वितीय अपील अर्ज दाखल केलेला आहे व त्याची सविस्तर कारणमीमांसा देखील दिलेली आहे.

प्रस्तुत प्रकरणी तत्कालीन जन माहिती अधिकाऱ्यांनी सूचित केल्याप्रमाणे अपिलार्थीना अद्यापही माहिती प्राप्त करून घेण्यास स्वारस्य असल्यास विद्यमान जन माहिती अधिकारी यांच्याशी संपर्क व समन्वय साधून त्यांनी केलेल्या तक्रारीच्या अनुषंगाने झालेल्या कार्यवाही बाबत कार्यालयीन अभिलेखात **कलम २ (च)** प्रमाणे उपलब्ध असलेल्या माहितीचे अवलोकन करून **त्यातील ५० पृष्ठांपर्यंतची माहिती विनामूल्य** प्राप्त करून घ्यावी.

आदेश

१. **वरील विवेचनानुसार जन माहिती अधिकारी यांनी कार्यवाही करावी.**
२. **अपिल क्र.६६०३/२०२६ निकाली काढण्यात येत आहे.**

स्वाक्षरीत/-

मुंबई **(राहुल भा.पांडे)**

दिनांक : ०५.०८.२०२६ **राज्य मुख्य माहिती आयुक्त**